CNR No. MHOS02-000079-2018

भु संपादन अर्ज .नं. १/२०१८ मधील नि.क्र.२० वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज जाबदार यांनी त्यांचे विरुध्द झालेला उलट तपास नाही हा आदेश रद्द करण्यासाठी दिला आहे. जाबदार यांचे म्हणण्यानुसार न्यायाच्या दृष्टीने साक्षीदारांचा उलटतपास घेण्याची संधी देणे योग्य आहे. जाबदार हा आजारी होता व त्यामुळे माहिती व कागदपत्रे वकिलांना देता आली नाही. सबब नि नं १८ व १९ यावर झालेला उलटतपास नाही हा आदेश रद्द करुन उलटतपास घेण्याची संधी देण्यात यावी.

२. हकरतदार यांनी सदर अर्जास हरकत घेतली की, अर्जातील कारण संयुक्तीक नाही . अर्जासोबत शपथपत्र नाही व अर्जावर जाबदार याची सही नाही. अर्ज केस लांबविण्यासाठी देण्यात आला आहे. सदर अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिपक्षांच्या परस्पर विरोधी कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | जाबदार यांनी मागणी केल्यानुसार उलट तपास नाही हा आदेश रद्द करण्यास पात्र आहेत काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मी मां सा

४. मुळ अर्ज हा राष्ट्रीय महामार्ग कायदा कलम ३ एच ४ नुसार संपादित जमीनीच्या नुकसान भरपाईच्या नमुद पक्षकारांचे हक्क ठरविण्यासाठी व नुकसान भरपाई अदा करणेबाबतचे आदेश करणेबाबत आहे. दिनांक ५–०३–२०१९ रोजी हरकतदार नं १ यांनी व दि २८–०६–२०१९ रोजी हरकतदारतर्फे साक्षीदार सावताराम ढोणे यांनी पुराव्याचे शपथपत्र दिलेले आहेत. परंतु जाबदार यांना पुरेशी संधी देवून सुध्दा त्यांनी उलटतपास घेतलेला नाही म्हणून त्यांचेविरुध्द उलटतपास नाही असा आदेश झालेला आहे. वादातील मुद्दा गुणदोषावर निकाली काढण्यासाठी जाबदार यांना उलटतपास घेण्याची संधी देणे गरजेचे आहे. सबब अर्ज जाबदार यावर खर्च बसवुन मंजुर करणे योग्य आहे. सबब मुद्दा नं.१ होकारार्थी देऊन मुद्दा नं.२ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

नि.क्र.२० वरील आदेश

## आ दे श

१. अर्ज जाबदार यांनी एकूण रक्कम रु.२००/– खर्च म्हणून हरकतदार नं १ यांना देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

Digitally signed by Vaibhav Bajrang Ghadge
Date: 2019.09.27 16:22:21 +0530

**(व्ही.बी.घाडगे)**

दिनांकः– २५/०९/२०१९

६ वे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
उस्मानाबाद.